**<u>अत्यंत महत्वाचे</u>**

**<u>विधानमंडळ प्राथम्य/तात्काळ</u>**

महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक ~~डीपीडीसी~~/मआ/डीपीडीसी/३५
दिनांक - १/०८/२०२१

**<u>कार्यालयीन परिपत्रक</u>**

विषय :- मा.विधानसभा/विधानपरीषद **सन २०२१ चे द्वितीय पावसाळी** अधिवेशनाच्या काळात दिवसभराचे कामकाज संपेपर्यंत कार्यालय न सोडणे बाबत.

संदर्भ :- विधीमंडळाचे **सन २०२१ चे द्वितीय पावसाळी अधिवेशन दि. ०५/०७/२०२१ पासून** सुरु होत असलेचे शासन परिपत्रक क्र. ७३४०/ई-१ दि. ६ मे २०२१ चे परिपत्रक.

महाराष्ट्र राज्य विधानसभा/विधानपरिषदेचे सन २०२१ चे द्वितीय पावसाळी अधिवेशन दि. ०५/०७/२०२१ पासुन सुरू होणार आहे. विधानसभा/विधानपरिषदेत चर्चेला घेतले जाणारे तारांकित प्रश्न/औचित्याचा मुद्दा/कपात सुचना/अर्धातास चर्चा/लक्षवेधी सुचना इत्यादी अधिवेशनाच्या दिवसभराच्या कामकाजात केव्हाही उपस्थित होऊ शकतात.

अधिवेशनाच्या काळात दिवसभराचे कामकाज हे संध्याकाळी ६.०० वाजल्यानंतर देखील सुरू असते व कामकाजाच्या दरम्यान महानगरपालिकेच्या संबंधित विषयाची माहिती शासनाकडून मागणी केल्यानंतर तातडीने उपलब्ध करून दयावी लागते अशा परिस्थितीत संबंधित खात्याचे अधिकारी/कर्मचारी कार्यालयीन वेळ संपल्यानंतर कार्यालय सोडून गेल्यानंतर, त्यांच्याशी संपर्क साधता येत नाही व पर्यायाने तातडीने माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. ही अडचण दूर करण्याकरीता प्रत्येक खात्याच्या कर्मचारी वर्गाने अधिवेशनाचे दिवसभराचे कामकाज संपेपर्यंत कार्यालय न सोडणे बाबत शासनाकडून कळविण्यात आले आहे.

सबब या कार्यालयीन परिपत्रकाव्दारे सर्व खातेप्रमुखांना आदेशीत करणत येते की, सर्व खातेप्रमुखांनी विधानसभा/ विधानपरिषदेचे अधिवेशन कालावधीत अधिवेशनाचे रोजचे कामकाज संपेपर्यंत प्रत्येक खात्यातील संबंधित कामकाज पहाणारे समन्वय अधिकारी, एक वरिष्ठ लिपिक अथवा एक कनिष्ठ लिपिक, एक शिपाई यांना कार्यालयात थांबण्याबाबत लेखी सुचना द्याव्यात. तसेच प्रत्येक खात्याने अधिवेशन काळात नेमणुक करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची नावे, मोबाईल नंबर व कार्यालयातील दुरध्वनी क्रमांक मुख्य अभियंता (वि) तथा समन्वय अधिकारी यांना ई-मेल द्वारे <u>skandul@punecorporation.org</u> /<u>dpdcud@gmail.com</u> यांना दिनांक ७/१२/२०२० पर्यंत पत्राने कळवावेत.

तसेच सर्व खातेप्रमुख यांनी आपल्या कार्यालयाकडील आवक - जावक बारनिशी दिनांक ०५/०७/२०२१ पासुन ते अधिवेशन समाप्तीच्या कालावधी संपेपर्यंत दररोज सुरू ठेवावीत व आपल्या विभागातील विधानसभा/विधानपरिषद प्रश्नांच्या संदर्भात कामकाज पहाणाऱ्या कर्मचाऱ्यांना आवश्यक ते आदेश द्यावेत.

जर एकापेक्षा जास्त खात्याशी संबंधित विषय असतील तर ज्या खात्याचा प्रमुख विषय असेल त्या त्या खात्यासमोर समन्वयक नमुद करून शासनाकडे पत्र पाठविण्याचे व त्या खातेप्रमुखांनी अन्य खातेप्रमुखांशी समन्वय साधून एकत्रित उत्तरांचा मसुदा तयार करुन त्यावर मा.महापालिका आयुक्त यांची स्वाक्षरी घेऊन अंतिम उत्तर मुदतीत शासनाकडे सादर करावे लागणार आहे.

जर प्राप्त झालेल्या पत्रातील विषय / प्रश्न आपल्या कार्यालयाशी संबंधित नसतील तर तसे मा. मुख्य अभियंता (विद्युत) तथा समन्वयक अधिकारी कार्यालयाकडे प्रत्यक्ष अथवा dpdcud@gmail.com, व skandul@gmail.com वर मेल व्दारे कळवावे तसेच भ्रमणध्वनी (९६८९९३१३७४) व्दारेही तातडीने कळवावे.

तसेच विधानमंडळाचे रोजचे कामकाज संपल्याबाबत मुख्य अभियंता (विद्युत) तथा समन्वय अधिकारी कार्यालयाकडुन दुरध्वनीद्वारे (०२०-२५५०१४०७, १३८९, १३७७) वर दररोज खात्री करावी व खातेप्रमुखांनी अधिवेशन कालावधीत सतर्क राहून आपल्या खात्याशी विधानसभा/विधानपरिषदेचे अधिवेशनाच्या कामकाजाशी संबंधित विषयांच्या उत्तरांची तातडीने पुर्तता करावी. **संदर्भांकित महाराष्ट्र शासन परिपत्रकानुसार कारवाई/पूर्तता होण्याबाबत सर्व खाते प्रमुखांनी याची दक्षता घ्यावी**

अन्यथा संबंधित खातेप्रमुखांना जबाबदार धरले जाईल याची नोंद घ्यावी.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

संदर्भांकित शासन परिपत्रक -

प्रत माहितीसाठी ....

१) अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका.
२) अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
पुणे महानगरपालिका.
३) अतिरिक्त महापालिका आयुक्त (इस्टेट)
पुणे महानगरपालिका.
४) मुख्य अभियंता (विद्युत) तथा समन्वय अधिकारी
पुणे महानपगरपालिका.

प्रति,

सर्व खातेप्रमुख,
पुणे महानगरपालिका.